Anekant Education Society's

## Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Displayed on : 31/08/2020 Notice No. : 23

## अल्पसंख्यांक समाजातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना केंद्र शासनाची मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना सन २०२०–२१

नवीन (Fresh) व नूतनीकरण (Renewal)

## Web site – www.scholarships.gov.in

केंद्र शासनाकडून **मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारशी व जैन** अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना राज्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०२०–२१ साठी **ऑनलाईन** भरण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे. यासाठी विद्यार्थ्यांचे नविन शिष्यवृत्ती व शिष्यवृत्तीचे नूतनीकरण करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे आहेत. कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन अर्ज स्विकारण्याची विनंती मान्य केली जाणार नाही. शै. वर्ष २०२०–२१ पासून महाराष्ट्र राज्यासाठी नवीन शिष्यवृत्ती (Fresh) करिता ४७५७५ संच निर्धारीत केलेले आहेत. **ऑनलाईन फॉर्म भरण्याची अंतिम मुदत दि. ३१/१०/२०२० आहे.**

* शिष्यवृत्तीसाठी पात्र अभ्यासक्रम :

११ वी ते पी.एच.डी, व्यावसायिक (डी.एड.,बी.एड्.,एम. एड्.,आय.टी.आय.) सर्व डिप्लोमा व अकरावी / बारावी स्तरांवरील एम.सी.व्ही.सी.अभ्यासक्रम. (तंत्र शिक्षण विभागातील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम यादीतील अभ्यासक्रम सोडून इतर सर्व).

* किमान पात्रता व अटी :

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. मागील परीक्षेत किमान ५०% गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.
३. **अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.**
४. नुतनीकरणासाठी विद्यार्थ्याने पुढील वर्गात प्रवेश घेतलेला असावा.
५. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. २ लाख इतकी आहे.
६. एका कुटुंबातील फक्त दोन अपत्यांनाच सदर योजनेचा लाभ घेता येईल.

Solankar 2/9

७. एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटींचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल /वसूल केली जाईल.
८. विद्यार्थ्याने राष्ट्रीयकृत बॅंकेत स्वत:चे खाते उघडणे आवश्यक आहे.

* **अर्ज करण्याची पध्दत (नविन मंजुरी/नूतनीकरण)**

१) अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

२) ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी नवीन विद्यार्थ्यांनी त्यांच्या बॅंक खात्याच्या पासबुकावर असलेल्या पूर्ण नावानुसारच संपूर्ण नाव टाकून नोंदणी करावी. आवश्यक माहिती भरल्यानंतर विद्यार्थ्याचा टेंपररी ॲप्लीकेशन आयडी प्राप्त होईल. हा आयडी विद्यार्थ्यांस वापरुन विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरावा. सदर आयडी विद्यार्थ्यास अर्ज करण्यासाठी व अर्जाची सद्य:स्थिती जाणून घेण्यासाठी उपयोगी होणार आहे.

३) ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या होमपेज वरील Frequently Asked Questions (FAQs) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

४) ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे भरुन ऑनलाईन अर्जात नमूद केलेली सर्व कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावी. विद्यार्थ्यांनी त्यांच्या माहितींसाठी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची तसेच अपलोड केलेल्या कागदपत्रांची प्रिंट काढून ठेवावी.

५) नूतनीकरणासाठी विद्यार्थ्यांनी त्यांचा मागील वर्षीच्या अर्जात भरलेला बॅंक खाते क्रमांक वापरुन नूतनीकरणाचा अर्ज www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर भरावा व अर्ज भरताना त्यात दर्शविण्यात आलेली सर्व कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावी. नूतनीकरणासाठी विद्यार्थ्यास ५०% पेक्षा कमी मार्कस् नसावेत.

६) नवीन व नूतनीकरणाचा अर्ज भरणा—या विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज भरताना त्यात दर्शविण्यात आलेली सर्व कागदपत्रे (उदा. विद्यार्थ्याचा फोटो, चालु वर्षाची फी भरल्याची पावती, मागील वर्षाची गुणपत्रिकेची प्रत, पालकांचे उत्पन्न प्रमाणपत्र, आधारकार्ड असल्यास इ.) स्कॅन करुन ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या जागी अपलोड करणे आवश्यक आहे. त्यातील माहिती भरुन नंतर ती कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत.(उदा. विद्यार्थ्याचे अल्पसंख्याक असल्याबाबतचे स्वयंघोषित घोषणापत्र, बोनाफाईड सर्टिफिकेट इ.)

७) ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेशी संपर्क साधुन सदर अर्ज महाविद्यालयाच्या/ संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा. सदर शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी आपला अर्ज ऑनलाईन सिस्टीममध्ये

येणे अनिवार्य आहे.

* **विद्यार्थ्यांनी फॉर्मसोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.**

१. अर्जावर विद्यार्थ्यांचे पासपोर्ट साईजचे छायाचित्र (फोटो) स्वाक्षरीसह असावा.

२. मागील वर्षाच्या गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत.

३. कायमचा निवासाच्या पत्त्यासंबंधी पुरावा म्हणून शिधापत्रिका, वीज / दुरध्वनी देयक, पारपत्र, निवडणूक ओळखपत्र, आधारकार्ड यापैकी कोणत्याही एका पुराव्याची छायांकीत व साक्षांकीत प्रत जोडावी.

४. विद्यार्थ्याचे अल्पसंख्याक असल्याबाबतचे स्वयंघोषित घोषणापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

५. मा. तहसिलदार यांचा सन २०१९—२० चा उत्पन्नाचा दाखला.

६. राष्ट्रीयकृत बॅंक पासबुकाच्या पहिल्या पानाची — ज्यावर खातेदाराचे नांव, पत्ता, खाते क्रमांक व आय.एफ.एस.सी. कोड नंबरची नोंद आहे, त्याची छायांकीत प्रत जोडावी. सदर बॅंक खाते चालू स्थितीत असावे.

७. आधार कार्डाची छायांकित प्रत जोडावी.

८. प्रवेश फी भरलेल्या चलनाची झेरॉक्स.

९. बोनाफाईड सर्टिफिकेट.

**तरी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या फॉर्मची प्रिंट व आवश्यक कागदपत्रांसहित tcc.schm2021@gmail.com या मेल आयडीवर स्कॅन करुन पाठवावेत. याची विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.**

रजिस्ट्रार
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती

TULJARAM CHATURCHAND COLLEGE
BARAMATI

प्राचार्य
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती